# नगर परिषद कार्यालय,मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त दिनांक 19/5/2022

---

## कार्यवृत्त

आज दिनांक 19/05/2022 रोजी सकाळी 11 वाजता मा.प्रशासक महोदय,नगर परिषद मलकापूर यांचे दालनात प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानुसार नगर अभियंता,पाणी पुरवठा अभियंता व संगणक अभियंता नगर परिषद मलकापूर यांनी खालील प्रमाणे सादर केलेल्या टिप्पणीचे वाचन सभे समोर करण्यात आले.

1. अ) प्रभाग क्र.9 मध्ये रमाई नगर बोर्डापासून ते रमाई नगर सार्वजनीक शौचालया पर्यत नाली बांधकाम करणे.

   ब) प्रभाग क्र.14 संत रोहिदास नगरमध्ये पिंपळे यांचे घरापासून रमेश सोनुने यांचे घरापर्यत नाली बांधकाम करणे.

काम क्र. (अ) प्रभाग क्र.9 मध्ये रमाई नगर बोर्डापासून ते रमाई नगर सार्वजनीक शौचालयापर्यत नाली बांधकाम करणे व काम क्र. (ब) प्रभाग क्र.14 संत रोहिदास नगरमध्ये पिंपळे यांचे घरापासून रमेश सोनुने यांचे घरापर्यत नाली बांधकाम करणे. या कामांची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,(अ) प्रभाग क्र.9 मध्ये रमाई नगर बोर्डापासून ते रमाई नगर सार्वजनीक शौचालयापर्यत कच्ची नाली असल्यामुळे सांडपाणी वाहून न जाता डाब साचून रस्त्यावरुन वाहत जाते व त्यामूळे दुर्गंधी निर्माण होवून रहिवाश्यांना त्रास होत आहे. तसेच काम क्र. (ब) प्रभाग क्र.14 संत रोहिदास नगरमध्ये पिंपळे यांचे घरापासून रमेश सोनुने यांचे घरापर्यत नाली बांधकाम करणेबाबत माजी.नगराध्यक्ष मा. ॲड. हरीष रावळ यांनी दिनांक 13/05/2022 च्या पत्राद्वारे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे उपरोक्त नमुद काम क्रमांक अ व ब ची कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत निधीतून करण्याबाबत म्हटले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता सालीपूरा व रोहीदास नगर भागातील रहिवाश्याच्या आरोग्याच्या दृष्टीने पक्क्या नाल्यांचे बांधकाम करण्याबाबतच्या कामांचा परिपुर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,बुलडाणा यांचेकडे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



Scanned with CamScanner

नागरी वस्ती सुधार योजना निधी अंतर्गत पाठविण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

2. **मलकापूर शहरातील विविध भागात पाईपलाईन टाकणे.**

मलकापूर शहरातील विविध भागात पाईपलाईन टाकण्याबाबतच्या खालील नमुद केलेल्या कामाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,मलकापूर शहरातील जायन्स क्लब,डॉ.सुदिप देशपांडे रोड,बिर्ला रोड,श्रीनिवासा अपार्टमेंट येथील नागरीकांचे पाणी मिळणेबाबत,नळ कनेशक्शन मिळणेबाबत कार्यालयात अर्ज प्राप्त झाले आहे.तसेच या भागातील नागरीकांना वेळोवेळी पाणी पुरवठा मिळणेबाबत कार्यालयात येऊन भेटी दिले आहेत.सदर भागात पाईप लाईन टाकलेली नाही.तेथील नागरीकांची पाण्याची वाढती मागणीनुसार पीव्हीसी पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.ती खालील प्रमाणे.

1. लायन्स क्लब रोड ते मनिष नाफडे सर यांच्या घरापर्यत 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.
2. डॉ.सुदिप देशपांडे यांच्या दवाखान्यापासून ते ॲडआर.व्ही पाटील यांच्या घरा पर्यत 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.
3. बिर्ला रोड ते श्रीनिवासा अपार्टमेंट पर्यत 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.

वरील सर्वबाबींचा विचार करता उपरोक्त कामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदर भागात 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन 15 वा वित्त आयोग/ न.प.निधीतून टाकण्याच्या कामास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

3. **सालीपुरा भागात श्री अत्तारकर ते दिपके यांच्या घरापर्यत जूनी सिमेंट पाईपलाईन काढून पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.**

सालीपुरा भागात श्री अत्तारकर ते दिपके यांच्या घरापर्यत जूनी सिमेंट पाईपलाईन काढून पीव्हीसी पाईप लाईन टाकण्याबाबतच्या कामाची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,सालीपूरा भागात सिमेंट लाईन आहे.ती पाईप लाईन वारंवार लिकेज होत असते.तसेच त्या भागातील लोकांच्या तक्रारी वारंवार येत असतात.सदर भागातील बहुतांश ठिकाणी पाणी पोहचत नाही.त्यामुळे सदर नागरीकांना



Scanned with CamScanner

पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.सिमेंट लाईन असल्यामूळे लिकेंज दुरुस्ती करीता येणारा खर्च मोठया स्वरुपात ~~आहेत~~ आहे.जूनी सिमेंट लाईन असल्यामुळे साहित्यसुध्दा बाजारपेठेमध्ये सहजासहजी उपलब्ध होत नाही.तेथील नागरीकांची पाण्याची वाढती मागणीनुसार सिमेंट पाईपलाईन काढून पीव्हीसी पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.जेणे करून सर्व नागरीकांना पाणी पुरवठा करता येईल.

वरील सर्वबाबींचा विचार करता, सालीपुरा भागात श्री अत्तारकर ते दिपके यांच्या घरापर्यत जूनी सिमेंट पाईपलाईन काढून पीव्हीसी पाईप लाईन टाकण्याबाबतच्या कामास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

4. वर्ष 2022-2023 नगर परिषद कार्यालय करीता इंटरनेट सुविधा करिता Railwire यांचे वार्षिक दर मंजूर करणेबाबत.

वर्ष 2022-2023 नगर परिषद कार्यालय करीता इंटरनेट सुविधा करिता Railwire यांचे वार्षिक दर मंजूर करणेबाबतच्या कामाबाबतची मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,नगर परिषद कार्यालयातील विविध विभाग,आरोग्य विभाग,सामान्य प्रशासन,जन्म-मृत्यू इत्यादी विभागामध्ये इंटरनेट सेवाचा वापर करण्यात येतो.सदर सेवा या मलकापूर नगर परिषद करिता Railwire यांच्या कडून घेण्यात येते.सदर सेवे करीता संस्थेकडुन नॉन मेट्रो शहरातील 8 mbps plan साठी सहा महिन्याकरीता GST पकडून एकूण अंदाजित 47000/- दर आकारण्यात येतो. सन 2022-2023 व चालू वर्षाकरिता सदर संस्थेचे दर मंजूर करणे आवश्यक आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता उपरोक्त इंटरनेट सुविधा पुरविण्याचे काम Railwire यांच्या कडून घेण्यात येते.या सेवे करीता Railwire यासंस्थेकडुन नॉन मेट्रो शहरातील 8 mbps plan साठी सहा महिन्याकरीता GST पकडून एकूण अंदाजित 47000/- दर आकारण्यात येतो.सन 2022-2023 करीता Railwire यांचेकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवेकरीता येणारा खर्च 47000/- रुपयास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**



Scanned with CamScanner